सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय**
**महाराष्ट्र राज्य, ४१२, ई बहिरट पाटील चौक,**
**मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर ,पुणे-४११०१६**
**web-www.dhepune.gov.in,** **E-Mail : mavi.dhepune@gov.in**
फोन नं.०२०/२६१२२११९

एनजीसी/२०२६/नॅक अ.अनु.म.वि./छ.सं.वि.-मवि.-/ई- दि.२४.०६.२०२६

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय- अशासकीय महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन व मानांकनाबाबत..**

**संदर्भ- १.** शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०१०/(२०/१०)/ विशि- ३,दि.०८.१०.२०१०
२.संचालनालयाचे क्र.एनजीसी/२०२३/नॅक/अशा.अनु.म.वि/औवि/मवि-३/ ३१७८,दि.०२.०३.२०२३ व समक्रमांक ६४६२,दि.२३ मे,२०२३ तसेच समक्रमांक ८९५९,दि.०९.०८.२०२३

उपरोक्त विषयी संदर्भिय संचालनालयाचे पत्र अवलोकनी घ्यावे .

सदर पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठांनी नॅक मूल्यांकन / पुनर्मूल्यांकन व मानांच्याबाबत एकदाही नॅक मूल्यांकन व मानांकन न झालेल्या अशासकीय महाविद्यालये व सद्यस्थितीत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन INACTIVE असलेल्या तसेच ज्याची नॅक वैधता संपूष्टात आलेली आहे अशा अशासकीय महाविद्यालयासंदर्भात नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ मधिल पोटकलम ६ ( ख) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांनाची तरतूद नमूद केली आहे. तसेच कलम ११० मधिल पोटकलम (४) नुसार “ महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृती किंवा, यथास्थिती, पुनर्रअधिस्वीकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असेल आणि असे महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृतीच्या किंवा पुनर्रअधिस्वीकृतीच्या आवश्यतांची पुर्तता करण्यात कसूर करील तेव्हा, अशा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला विद्यापीठाकडून कोणतीही संलग्नता देण्यात येणार नाही. ”अशा प्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.

सबब, वर नमूद महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदीनुसार अशा महाविद्यालयांबाबत विद्यापीठांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

तसेच ज्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन /पुनर्मूल्यांकन पुर्ण केले नाही अशा महाविद्यालयांची माहिती सोबतच्या तपशिलात नमूद करुन संचालनालयास सादर करण्यात यावी.

महाविद्यालयांबाबत खालील तपशिलात माहिती सादर करण्यात यावी.

**तपशिल**

| अ. क्र. | विभाग | महाविद्यालय / संस्थंचे नांव | यापूर्वी नॅक मुल्यांकन झाले आहे / नाही असल्यास, नॅक ग्रेड / CGPA व Cycle I /II/III | नॅक वैधता कालावधी | नॅक मूल्यांकन झाले नसल्यास त्याची कारणे | नॅक पूर्नमूल्यांकनाची सद्यास्थिती (LOI / IIQA Submission/ SSR submission / Peer Team Visit etc.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

Digitally signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 24-06-2026 18:12:03

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
**प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१**